**पाहिजेत**

ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास पाहिजेत

नामांकित कंपनी साठी सबस्टेशन कामासाठी शिक्षण ITI इलेक्ट्रिशीयन/ वायरमन, 12 वी पास फ्रेश/ अनुभवी मुले त्वरित पाहिजे.

संपर्क - 9923155996



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com






| सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक १२ वा | शनिवार, दि. २५ जुलै २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR |
|---|---|---|---|---|---|







## संपादकीय

# राजीनाम्यापलीकडे... परीक्षा व्यवस्थेच्या पुनर्बांधणीची वेळ

स्पर्धा परीक्षांमधील पेपरफुटी हा केवळ प्रशासकीय निष्काळजीपणाचा विषय नाही; तो भारतीय लोकशाहीतील समान संधी, गुणवत्ताधिष्ठित निवड प्रक्रिया आणि तरुणांच्या भविष्यावरील विश्वासाला लागलेला तडा आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर केवळ एखाद्या मंत्र्याच्या राजीनाम्यात शोधणे अपुरे ठरेल. नैतिक जबाबदारी म्हणून राजीनाम्याची मागणी योग्य असली, तरी परीक्षा व्यवस्थेतील संस्थात्मक दोष दूर करण्यासाठी व्यापक आणि दीर्घकालीन सुधारणांची गरज आहे. गेल्या काही वर्षांत नीट, यूजीसी-नेट, शिक्षक भरती, पोलीस भरती, आरोग्य विभाग, लिपिक भरती अशा अनेक परीक्षांमध्ये प्रश्नपत्रिका गळतीच्या घटना समोर आल्या. प्रत्येक वेळी परीक्षा रद्द झाली, चौकशा झाल्या, आरोपींना अटक झाली; मात्र काही काळानंतर त्याच स्वरूपाच्या घटना पुन्हा घडल्या. यावरून स्पष्ट होते की समस्या व्यक्तीमध्ये नसून व्यवस्थेमध्ये आहे.

पेपरफुटीमुळे लाखो विद्यार्थ्यांचा वेळ, पैसा, मानसिक स्वास्थ्य आणि अनेकदा वयोमयार्देतील मौल्यवान संधीही हिरावल्या जातात. संविधानाने दिलेले समान संधीचे तत्त्व अशा घटनांमुळे कमकुवत होते. म्हणूनच हा केवळ शिक्षण क्षेत्राचा नव्हे, तर सामाजिक न्यायाचा आणि लोकशाहीच्या विश्वासार्हतेचा प्रश्न आहे.

केंद्र सरकारने सार्वजनिक परीक्षा (अनुचित साधनांचा प्रतिबंध) अधिनियम, २०२४ लागू करून कठोर शिक्षेची तरतूद केली आहे. हा कायदा महत्त्वाचा असला, तरी त्याचे यश प्रभावी आणि निष्पक्ष अंमलबजावणीवर अवलंबून असेल. भारतात कायद्यांचा अभाव नाही; सातत्यपूर्ण अंमलबजावणीचा अभाव आहे.

आज गरज आहे ती तंत्रज्ञानाधारित, पारदर्शक आणि सुरक्षित परीक्षा व्यवस्थेची. प्रश्नपत्रिकांचे एण्ड-टू-एण्ड एन्क्रिप्शन, डिजिटल ट्रॅकिंग, बायोमेट्रिक पडताळणी, कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर, स्वतंत्र सुरक्षा लेखापरीक्षण आणि सायबर सुरक्षा यंत्रणा ही आता पर्याय नसून आवश्यकता आहे. त्याचबरोबर स्वतंत्र परीक्षा सुरक्षा प्राधिकरण, विशेष न्यायालये, व्हिसलब्लोअर संरक्षण आणि अधिकाऱ्यांवरील प्रभावी देखरेख यांसारख्या संस्थात्मक सुधारणा अपरिहार्य आहेत.

लोकशाहीत मंत्री बदलणे तुलनेने सोपे असते; परंतु संस्था बदलण्यासाठी राजकीय इच्छाशक्ती, सक्षम प्रशासन आणि समाजाचा सातत्यपूर्ण दबाव आवश्यक असतो. विद्यार्थ्यांचा परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास पुनर्स्थापित करणे ही कोणत्याही सरकारची सर्वोच्च जबाबदारी आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला हे निश्चयाने वाटले पाहिजे की त्याचे यश केवळ त्याच्या गुणवत्तेवर अवलंबून आहे—पैसा, ओळख किंवा पेपरफुटीवर नाही. राजीनाम्यापेक्षा व्यवस्थापरिवर्तनाला प्राधान्य दिले, तरच परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास परत मिळेल. आणि तो दिवस भारतीय लोकशाहीच्या विजयाचा खरा दिवस ठरेल.

# अनगरच्या केदार नकाते यांची अन्न व औषध प्रशासन विभागात इन्स्पेक्टरपदी निवड



**अनगर (कटूसत्य वृत्त):-** अनगर येथील श्रीअनगरसिध्द शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कै. शंकरराव बाजीराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा माजी विद्यार्थी केदार नकाते यांची अन्न व औषध प्रशासन विभागात इन्स्पेक्टर पदावर निवड झाल्याबद्दल विद्यालयाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

श्रीअनगरसिध्द शिक्षण प्रसारक मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत ढोले यांच्या शुभहस्ते शाल, श्रीफळ, पुष्पहार व देऊन केदार नकाते यांचा गौरव करण्यात आला. यावेळी बोलताना ढोले यांनी, "जिद्द, सातत्यपूर्ण परिश्रम आणि प्रामाणिक प्रयत्नांच्या बळावर यश मिळते. केदार नकाते यांचे यश हे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे," असे सांगितले.

यावेळी प्राचार्य महादेव चोपडे, उपप्राचार्य माधव खरात, पर्यवेक्षक राजेंद्र डोके, आबासाहेब नकाते, परमेश्वर थिटे,रमेश चव्हाण,गोरख गायकवाड, सत्यवान दाढे, बब्रुवान बोडके, गजानन जिरगे, बापुराव घुले गणेश नकाते तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व माजी विद्यार्थी उपस्थित होते.

सत्काराला उत्तर देताना केदार नकाते यांनी विद्यालयातील शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांच्या पाठबळामुळे हे यश मिळाल्याचे सांगत विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करून चिकाटीने प्रयत्न केल्यास कोणतेही यश अशक्य नसल्याचा विश्वास व्यक्त केला.

# कल्याणशेट्टी शिक्षण संकुलातील विद्यार्थी व शिक्षकांनी अनुभवला रिंगण सोहळा



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** कै पंचप्पा कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात आषाढी एकादशी निमित्त श्रद्धा, भक्ती आणि समतेचा संदेश देणारा पालखी रिंगण सोहळा व अभंग नृत्याचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. हेची दान देगा देवा तुझा विसर न व्हावा असे विद्यार्थी व विद्यार्थिनींनी अभंगाचा जयघोष करत याची देही याची डोळा, नयनम्य कार्यक्रम रिंगण सोहळा कार्यक्रम अनुभवण्याचे भाग्य लाभल्यामुळे प्रेक्षक पुरते सुखावून गेले.

सौ सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालय,

सेमी इंग्लिश व प्राथमिक मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आषाढी एकादशी निमित्त रिंगण सोहळा दर्शविणारा संस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

प्रारंभी श्री संत ज्ञानेश्वर महाराज व जगद्गुरु संतश्रेष्ठ तुकाराम महाराज तसेच शेगावचे गजानन महाराज यांचा जयघोष करत टाळ मृदूंगाच्या तालात हरिनामाच्या गजरात तिन्ही पालख्या विद्यार्थ्यांनी रिंगण सोहळ्यासाठी आणल्यानंतर संस्थेच्या व्यवस्थापनाच्या सदस्या पूनम कोकळगी, रूपाली शहा यांनी विठोबा रुक्मिणीच्या मूर्तीचे पूजन केले. यावेळी संस्थेचे सचिव मल्लिकार्जुन मसुती, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, दिगंबर जगताप, सिद्रामप्पा पाटील, खंडेराव घाटगे, सुर्यकात रूगे आदी उपस्थित होते.

त्यानंतर प्रांगणात रिंगण सोहळा शिस्त, सेवा सहकार्य आणि सामाजिक ऐक्याचे प्रतीक म्हणून संपन्न झाला. रिंगण सोहळ्यामध्ये पारंपारिक पोषाखातील विद्यार्थी, महिला-पुरुष शिक्षक सहभागी झाले होते. अक्षरशः ज्ञानोबा तुकारामाच्या जयघोषाने शाळेचा परिसर दुमदुमून गेला. पालख्यासमोर विद्यार्थी विद्यार्थिनींनी अभंगाच्या तालावर प्रेक्षणीय नृत्य करून सोहळ्यास रंगत आणली. सर्व जाती धर्माच्या पंथाच्या मुलांचे एकत्रित गोल रिंग पाहण्यासारखा होता.

रिंगण सोहळा कार्यक्रमाचे प्रस्ताविक निशिगंधा सोमेश्वर यांनी केले, सूत्रसंचलन कल्पना स्वामी व दिगंबर जगताप यांनी केले, सर्वांचे आभार आरती थोरात यांनी मानले.

या उपक्रमाचे संस्थेचे अध्यक्ष आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी, ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, संचालिका शांभवीताई कल्याणशेट्टी यांनी कौतुक केले.

**शिक्षक विद्यार्थ्यांनी घेतली स्वच्छतेची शपथ**

आषाढी एकादशीच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या रिंगण सोहळा सांस्कृतिक कार्यक्रमात शिक्षक व विद्यार्थ्यांनी सार्वजनिक ठिकाणी घाण करणार नाही, प्लास्टिकचा वापर करणार नाही, स्वतः बरोबर परीसर देखील स्वच्छ ठेवीन अशी शपथ घेतली.

**समानतेची शिकवण देणारी वारकरी परंपरा प्रेरणादायी**

समाजात प्रेम, बंधुभाव, पर्यावरण संवर्धन, स्वच्छता आणि सामाजिक जबाबदारी याची जाणीव निर्माण करण्यासाठी वारकरी परंपरा प्रेरणादायी आहे. समानतेने वागणे, व्यसनमुक्त जीवन जगणे आणि समाज हितासाठी कार्य करणे हीच विठुरायाची खरी भक्ती आहे असा संदेश संचालिका शांभवीताई कल्याणशेट्टी यांनी दिला.

# ज्ञानोबा-तुकारामच्या जयघोषात दुमदुमले एमआयटी विश्वशांती गुरुकुल



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** माईर्स एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूलमध्ये आषाढी एकादशीचा उत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या मुख्याध्यापिका रुपाली हजारे आणि ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य राजकुमार गायकवाड यांच्या हस्ते पालखी पूजनाने झाली. यानंतर विद्यार्थ्यांनी विठ्ठल -रुक्मिणी व वारकऱ्यांच्या पारंपरिक वेशभूषेत टाळ-मृदंगाचा गजर करत, अभंग-भजन म्हणत आणि 'ज्ञानोबा-तुकारामा'च्या जयघोषात काढलेल्या दिंडीने संपूर्ण विद्यालय परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. विद्यार्थ्यांनी पारंपरिक लोकखेळ सादर करत समृद्ध सांस्कृतिक वारशाचे सुंदर दर्शन घडविले. विद्यार्थ्यांनी संत तुकाराम, संत मीराबाई, संत चोखामेळा, संत नरहरी सोनार आणि संत सावता माळी यांच्या जीवनावर आधारित प्रेरणादायी कथा सादर केल्या. या सादरीकरणातून संतांची भक्ती, त्यांची समता व मानवतेची शिकवण आणि समाजप्रबोधनाचा संदेश प्रभावीपणे देण्यात आला.

यानंतर 'विठ्ठल भक्ती आणि आजची युवा पिढी' आणि 'आधुनिक जगात तणाव कमी करण्यासाठी आध्यात्मिक जीवनशैली कशा प्रकारे उपयुक्त ठरू शकते' आदी विषयांवर विद्यार्थ्यांनी निबंध लेखन करून अध्यात्म, संस्कार आणि आधुनिक जीवनशैलीमध्ये मूल्यांचे महत्त्व प्रभावीपणे मांडले.

यावेळी बोलताना मुख्याध्यापिका रुपाली हजारे म्हणाल्या, "विद्यार्थ्यांना वारकरी संप्रदायाची ओळख करून देणे, संतपरंपरेचे विचार त्यांच्या मनात रुजविणे आणि संस्कारक्षम पिढी घडविणे हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे." ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य राजकुमार गायकवाड यांनी "शालेय जीवनात संस्कार आणि अध्यात्माची जोड मिळाल्यास विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व अधिक समृद्ध होते," असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोलाचे योगदान दिले.

# स्नेहालय न्यू इंग्लिश स्कूलमध्ये बाल दिंडी उत्साहात संपन्न



**करमाळा (कटूसत्य वृत्त):-** करमाळ्यातील स्नेहालय न्यू इंग्लिश स्कूल येथे आषाढी एकादशीनिमित्त बाल दिंडी उत्साही वातावरणात संपन्न झाली. संस्थेचे अध्यक्ष जयंत दळवी, मुख्याध्यापिका धनश्री दळवी तसेच पालकांच्या हस्ते विठ्ठल-रुक्मिणी व संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी संत ज्ञानेश्वर महाराज यांनी भिंत चालविल्याचा प्रसंग विद्यार्थ्यांनी सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

त्यानंतर 'ज्ञानोबा माऊली तुकाराम', 'जय जय राम कृष्ण हरी' या गजरात पालखीसह बाल दिंडी काढण्यात आली. विद्यार्थ्यांनी विठ्ठल-रुक्मिणी, संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज, वारकरी आदींची आकर्षक वेशभूषा परिधान केली होती. हातात भगवे झेंडे, टाळ आणि मृदंग यांच्या साथीने विठ्ठल नामाच्या जयघोषात परिसर भक्तिमय झाला.

या बाल दिंडीत स्नेहालय न्यू इंग्लिश स्कूलच्या सर्व विद्यार्थ्यांसह पालकांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. पालक प्रतिनिधी गोविंद विटकर यांनी विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप केले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष जयंत दळवी, मुख्याध्यापिका धनश्री दळवी, सहशिक्षिका शिवांगी कांबळे, शुभांगी खळदकर, रोहिणी गरड, अमृता पाटील, अश्विनी झाडबुके, सविता पवार, कृष्णा पवार, संजय शिंदे, युवराज कानगुडे, गुलफाम कुरेशी तसेच सर्व विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ऑर्किडच्या दिंडीत विठुरायाच्या गजरात साक्षरतेचा जागर



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** आषाढी एकादशीनिमित्त सोलापूर शहरातील नागेश करजगी ऑर्किड स्कूल मध्ये बालदिंडीचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला संस्थेचे विश्वस्त तथा युवा उद्योजक यशराजव करजगी, व्यवस्थापक अक्षय चिडगुंपी यांच्या हस्ते विठ्ठल रुक्मिणी मातेची आरती व पालखी पुजन करण्यात आले. यावेळी ज्यु.कॉलेज प्राचार्या स्मिता कुलकर्णी, मार्गदर्शिका मीना पारखे उपस्थित होते. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष डॉ.कुमार दादा करजगी व संस्थेच्या सचिवा सौ.वषार्ताई विभुते यांनी आषाढी एकादशीनिमित्त विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

शाळेतील विद्यार्थ्यांनी विठुरायाच्या नामस्मरण गितावर नृत्य सादर करून विठ्ठलाचा जयघोष केला. यानंतर शाळेच्या आवारातुन दिंडीचे प्रस्थान होऊन ती जुनी मिल मार्गे वीजवितरण कार्यालय येथील महादेव मंदिरास प्रदक्षणा घालुन शाळेच्या मैदानावर येऊन अश्वाच्या सोबतीने विद्यार्थी व शिक्षकांनी रिंगण सोहळा पार पाडला. या बालदिंडीत नर्सरीच्या बालचमुंनी विविध संताची वेशभूषा साकारुन दिंडीची शोभा वाढविली.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तृप्ती चाटी यांनी केले.सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# माळीनगर साखर कारखान्याचे मिल रोलरचे पूजन



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** येथील दि सासवड माळी शुगर फॅक्टरी माळीनगर या साखर कारखान्याच्या सन २०२६ -२७ च्या ९२ व्या गाळप हंगामासाठी सज्ज होत असलेल्या कारखान्यातील मिल रोलर चे पूजन कारखान्याचे चेअरमन मोहन लांडे यांच्या हस्ते विधिवत पूजन करून करण्यात आले.


या कार्यक्रमास माजी मॅनेजिंग डायरेक्टर व विद्यमान संचालक राजेंद्र गिरमे,सरपंच अनुपमा एकतपुरे,मॅनेजिंग डायरेक्टर गणेश इनामके,होलटाईम डायरेक्टर निखिल कुदळे, व्हा.चेअरमन विशाल जाधव, संचालक राहुल गिरमे,परेश राऊत, सतीश गिरमे, निळकंठ भोंगळे, इंडिपेंडंट डायरेक्टर किशोरी चवरे, शुगरकेन सोसायटीचे व्हा.चेअरमन मनीष रासकर, एज्युकेशन सोसायटीचे संचालक पृथ्वीराज भोंगळे,म.फुले दूध डेअरीचे संस्थापक सेक्रेटरी मिलिंद गिरमे,भागधारक अनिल झगडे, अनिल एकतपुरे,रिंकू राऊत, आदी मान्यवरांसह कारखान्याचे,चीफ इंजिनिअर सुरेश जगताप, अकाउंट ऑफिस इन्चार्ज पोपट नाळे, इलेक्ट्रिक इंजिनिअरिंग अनिल जाधव, शेतकी अधिकारी रोहित जावळे, केनडेव्हलप अधिकारी विराज कुदळे,सिव्हिल इंजिनियर महेश शिंदे, इरिगेशन अधिकारी सचिन कुदळे, डिस्टिलरी इन्चार्ज अविनाश गायकवाड,स्टोअर किपर सचिन टिळेकर, शुगर गोडाऊन किपर मनोज नेवसे, टाईम किपर विशाल बोरावके, सुरक्षा अधिकारी शब्बीर शेख, आदी कामगार उपस्थित होते.

**सोलापूर महानगरपालिका,सोलापूर**
इंद्रभुवन आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर - ४१३००१.
विभागीय कार्यालय क्र. ४

**पहिली जाहिर प्रसिध्दीकरण निविदा मसुदा**

सोलापूर महानगरपालिका विभागीय कार्यालय क्र.४ कडील प्रभाग क्रमांक १९ अ मधील भांडवली कामे सन -२०२६-२०२७ सदरीतून म.न.पा. संकेतस्थळावरील अनु.क्रं. ६३८६,६३८५,६३८४ या कामाचे टेंडर सोलापूर महानगरपालिकेच्या www.solapurcorporation.gov.in या संकेतस्थळावर दिनांक २३/०७/२०२६ पासून ते दिनांक - ३१/०७/२०२६, दुपारी ०१ : ०० पर्यंत उपलब्ध आहे. मा.क. दि.२४/०७/२०२६

**सही/-**
**विभागीय अधिकारी**
**विभागीय कार्यालय क्र.४**
**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**




हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# एस.एन.डी.स्कूलमध्ये टाळांच्या गजरात दुमदुमला पालखी सोहळा

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** आषाढी एकादशी निमित्त अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात नातेपुते येथील एस.एन.डी. सीबीएसई इंटरनॅशनल स्कूलमध्ये श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा व बालदिंडीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सोलापूर जिल्हा परिषदेचे मा. उपाध्यक्ष बाबाराजे देशमुख, शेंदुर्णी (जळगाव) येथील संजय



गरूड, सरोजनी गरूड, रेणुका महिला पतसंस्थेच्या चेअरमन सुचित्रादेवी देशमुख, श्रुतिका देशमुख, अर्जून जठार यांच्या शुभहस्ते पालखीचे पूजन करून आरती करण्यात आली.

या भक्तिमय सोहळ्यात मुख्याध्यापक संदीप पानसरे, उपमुख्याध्यापक शकूर पटेल, प्राथमिक विभाग प्रमुख नीलम डोंबाळे, पीआरओ मनोज राऊत यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी तसेच बाल वारकरी मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते. संतांच्या अभंगांचा गजर, टाळ-मृदुंगाच्या निनादात आणि फुगड्यांच्या आनंदी खेळांमुळे प्रमुख मान्यवर शिक्षक व विद्यार्थी भक्तिरसात न्हाऊन निघाले होते.

नर्सरी ते इयत्ता दुसरीच्या विद्यार्थ्यांनी विठ्ठल, रुक्मिणी श्री संत ज्ञानेश्वर, श्री संत तुकाराम, मुक्ताई तसेच लहान मोठे विद्यार्थी धोतर, कुर्ता, गांधी टोपी आणि विद्यार्थिनी नऊवारी साडीत डोक्यावर तुळश घेऊन शाळेत आल्या होत्या

बाल वारकऱ्यांनी "ज्ञानोबा-तुकाराम" आणि "रामकृष्ण हरी"च्या जयघोषात पालखी घेऊन स्कूलच्या परिसरातुन प्रदक्षिणा केली. ही बालदिंडी स्कूलच्या मैदानात पोहोचल्यानंतर पारंपरिक पद्धतीने औक्षण करून बाल वारकऱ्यांचे उपस्थित मान्यवरांनी स्वागत केले.या प्रसंगी ग्रामस्थांनी बालचमूंचे व विद्यार्थ्यांच्या उत्साही सहभागाचे मनापासून कौतुक केले.शेवटी सामूहिक भजन व भावगीताने या भक्तिमय आणि चैतन्यमय सोहळ्याची सांगता करण्यात आली.

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. अनेक शतकांपासून चालत आलेली पंढरपूरची वारी ही आपल्या महाराष्ट्राचे वैभव आणि संस्कृतीचे प्रतीक आहे. आज तोच भक्तीचा आणि शिस्तीचा सोहळा आपण आपल्या एस.एन.डी स्कूलच्या प्रांगणात आपल्या सर्वांना अनुभवायला मिळाला. विठू माऊलीच्या जयघोषाने आणि ज्ञानोबा - तुकाराम च्या गजराने . स्कूलचा संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. या सोहळ्याच्या माध्यमातून आपल्याला अनेक गोष्टी शिकायला मिळतात. समृध्द परंपरेची ओळख व एकत्र राहण्याची भावना आपल्यात निर्माण होते.

**बाबाराजे देशमुख**
संस्थापक अध्यक्ष : एस.एन.डी.इंटरनॅशनल स्कूल, नातेपुते.




॥ झाडु संतांचे मार्ग ॥ करु पंढरीचा स्वर्ग ॥


## पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर

दुरध्वनी क्र. (02186) 223012
comcpandharpur@gmail.com

स्वच्छ भारत अभियान | स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) | स्वच्छ सर्वेक्षण 2026 | माझी वसुंधरा 7.0

जा.क्र./पंनपं/आरोग्य/3737/2026 दि.21.07.2026

## आषाढी यात्रा 2026



## यात्रेकरूंना व भाविकांना नम्र आवाहन

भुवैकुंठ नगरीमध्ये येणाऱ्या भाविक, भक्त यात्रेकरूंचे हार्दिक स्वागत आहे. शहराचे व चंद्रभागा नदीचे पावित्र्य व स्वच्छता राखणे हे आपल्या सर्वांचे आद्य कर्तव्य आहे. सार्वजनिक आरोग्य अबाधित राखणे करीता खालील सुचनांचे सर्वांनी पालन करुन सहकार्य करावे ही नम्र विनंती.

1) **राहण्याची व्यवस्था :-** यात्रेकरु, दिंडीकरी,फडकरी, भाविकभक्त इ. यांची राहणेची सोय भक्ती सागर 65 एकर परिसर या जागेमध्ये केलेली आहे. कोणत्याही धोकादायक इमारती मध्ये राहु नये.

2) **उघड्यावरील अन्न टाळा :-** आपले आरोग्य बिघडू नये म्हणून उघड्यावरील व माश्या बसलेले अन्नपदार्थ, शिळे अन्न आणि नासकी फळे, कापलेली फळे खाणे टाळावे.

3) **शुद्ध पाणी :-** नगरपरिषदेने उपलब्ध करून दिलेल्या शुद्ध व पिण्याच्या पाण्याचाच वापर करावा.
नदीचे व बोअरचे पाणी पिऊ नये.

4) **घनकचरा व्यवस्थापन :-** आपल्या मठ/संस्था, वास्तव करणाऱ्या ठिकाणी इ. मध्ये निर्माण होणारा कचरा/पत्रावळी द्रोण, शिळे खरकटे अन्न इ. ओला, सुका असा वेगवेगळा साठवून ठेवावा तो नगरपालिकेची घंटा गाडी आल्यावर त्यामध्येच द्यावा.

5) **शौचालयांचा वापर :-** नगरपरिषद
प्रशासनाने ठिकठिकाणी उभारलेल्या तात्पुरत्या व कायमस्वरूपी शौचालयांचाच वापर करावा .तसेच आपल्या वास्तव्याच्या ठिकाणांच्या शौचालयाचा वापर करावा. उघड्यावर शौचास बसू नये.

6) **प्लॅस्टिकचा वापर टाळा :-** पंढरपूर शहरात प्लास्टिक पिशव्यांवर बंदी आहे. पंढरपूर परिसर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी प्लॅस्टिक पिशव्या वापरू नका. कृपया कापडी पिशव्यांचा वापर करावा.

7) **प्रशासनाला सहकार्य करा :-** आपत्कालीन परिस्थितीत पोलीस आणि स्वयंसेवकांच्या सूचनांचे पालन करा.

8) **वैद्यकीय मदत :-** कुठेही त्रास जाणवल्यास तात्काळ जवळच्या नगरपरिषद प्रथमोपचार केंद्र किंवा शासकीय रुग्णालयाशी संपर्क साधावा.

9) **पार्कींग व्यवस्था ठिकाणे :-** अंबाबाई पटांगण,संत गजानन महाराज मठामागे, इसबावी विसावा मंदिर समोर, सांगोला रोड एम.एस.ई.बी.समोर, कुंभार घाट समोर कवठेकर गल्ली, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर मरिआई पटांगण, कराड रोड वेअर हाऊस जवळ, रेल्वे स्टेशन मैदान, आहिल्या देवी चौक नविन पुलाजवळ, वाखरी पालखी तळ, कुटूंबाडी रोड गणेश ढाबा पिछाडी इत्यादी ठिकाणी पार्किंग व्यवस्था करण्यात आलेली आहे.

**वरील सुचनांचे पालन करणे आपल्या व सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने हितकारक आहे.**

| **(श्री. महेश रोकडे)** | **(श्री.महादेव धोत्रे)** | **(डॉ. सौ. प्रणिता भालके)** |
|---|---|---|
| मुख्याधिकारी | उप नगराध्यक्ष | नगराध्यक्षा |
| पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर | पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर | पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर |




महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व पंचायत राज विभाग
नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री
देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री
ग्रामविकासाची वारी
पंढरीच्या दारी
मान माऊलींचा, सेवा वारकऱ्यांची
वारकऱ्यांच्या सेवेसाठी व सुरक्षेसाठी सदैव तत्पर !
मुख्यमंत्री वारकरी सुविधा केंद्र
चरण सेवा
स्वच्छता गृह
महिलांसाठी स्नानगृह
मोबाईल चार्जिंग व्हॅन
हिरकणी कक्ष
आरोग्य सेवा
भजनसंध्या
मुख्यमंत्री आरोग्य रथ
वैद्यकीय कीट
बाइक ॲम्ब्युलन्स
पालखी तळ मजबुतीकरण
पिण्याच्या पाण्याची सोय
वारी पश्चात साफसफाई
स्वागत कमान
दिशादर्शक फलक
आपत्ती व्यवस्थापन
श्लोक फलक
पालखी महामार्ग
पालखी तळ विद्युतीकरण
फिजिओथेरपी सेवा
अशा विविध सुविधा शासनाकडून वारकऱ्यांच्या सेवेसाठी उपलब्ध.
वारकऱ्यांची सेवा म्हणजेच पांडुरंगाची सेवा !
महाराष्ट्राच्या संस्कृतीचा अमूल्य ठेवा असणारी,
सामाजिक सलोखा, स्वच्छता, आणि भक्ती यांचे
दर्शन घडवणारी निर्मल वारी.
देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री
एकनाथ शिंदे
उपमुख्यमंत्री
सुनेत्रा अजित पवार
उपमुख्यमंत्री
जयकुमार गोरे
मंत्री, ग्रामविकास आणि पंचायत राज
योगेश कदम
राज्यमंत्री, ग्रामविकास आणि पंचायत राज